Estd.1962
'A++' Accredited by NAAC(2021)
With C.G.P.A. 3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## शिवाजी विद्यापीठ जातीआधारित भेदभाव प्रतिबंध समिती

**(Committee for Prevention of Caste Based Discrimination in Shivaji University, Kolhapur )**

विद्यापीठ अनुदान आयोगाने दि.१९/७/२०११, दि.२/७/२०१३ व १/३/२०१६ रोजींच्या पत्रान्वये विद्यापीठातील अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्यासंदर्भात कोणत्याही पध्दतीचा जातीआधारित भेदभाव होऊ नये याबाबत सर्व शिक्षक/शिक्षकेतर अधिकारी/कर्मचारी यांनी योग्य ती खबरदारी घेण्याबाबत सूचना दिलेल्या होत्या. या अनुषंगाने विद्यापीठ अनुदान आयोगाने जा.क्र. एफ–१–७/२०११/ (एससीटी), दि.२६/६/२०१९ च्या पत्रान्वये अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती/इतर मागास वर्ग प्रवर्गातील विद्यार्थी/शिक्षक/शिक्षकेतर अधिकारी/कर्मचारी यांच्यासंदर्भात जातीआधारित भेदभाव होत असल्यास अशा तक्रारींचे निराकरण करण्यासाठी जातीआधारित भेदभाव प्रतिबंध समितीचे **(Committee for Prevention of Caste Based Discrimination in Shivaji University, Kolhapur)** गठन विद्यापीठात करण्यात यावे, असे कळविलेले आहे.

उपरोक्तबाबत विद्यापीठ अधिकार मंडळाने केलेल्या ठरावास अनुसरुन मा.प्रभारी कुलगुरु यांनी विद्यापीठात खालीलप्रमाणे जातीआधारित भेदभाव प्रतिबंध समितीचे गठन पुढील आदेशापर्यंत केलेले आहे. सदर समितीचे कामकाज विद्यापीठ अनुदान आयोगाच्या उपरोल्लिखित पत्रानुसार राहील.

| | | |
|---|---|---|
| १ | प्रा. (डॉ.) एन.बी. गायकवाड, वनस्पतीशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | अध्यक्ष |
| २ | प्रा.(डॉ.) एस.डी.शिंदे, भूगोल अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | सदस्य |
| ३ | प्राचार्य (डॉ.) ए.आर.गाडे, काकासाहेब चव्हाण महाविद्यालय, तळमावले,सातारा | सदस्य |
| ४ | प्राचार्या (डॉ.) टी.बी.मुडेकर, कमला कॉलेज, कोल्हापूर | सदस्य |
| ५ | प्रा.डॉ.ए.एम.सरवदे, इंग्रजी अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | सदस्य |
| ६ | डॉ.एस.टी.कोंबडे, अर्थशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | सदस्य |
| ७ | डॉ.(श्रीमती)एस.ए.किर्तने, यशवंतराव चव्हाण कॉलेज ऑफ सायन्स, कराड, जि.सातारा | सदस्य |
| ८ | प्रा.(डॉ)एस.एस.पाटील, छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा | सदस्य |
| ९ | श्री ए.जी.खामकर, अति.महासचिव, महाराष्ट्र राज्य कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघ | सदस्य |
| १० | श्री. डी.आय. शिंदे, पदवी वितरण विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | सदस्य |
| ११ | डॉ.पी.एस. पांडव, उपकुलसचिव, विशेष कक्ष, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | सदस्य सचिव |

अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती/इतर मागास वर्ग प्रवर्गातील विद्यार्थी/शिक्षक/शिक्षकेतर अधिकारी/कर्मचारी यांच्यासंदर्भात कोणत्याही पध्दतीचा जातीआधारित भेदभाव होत असेल तर त्याबाबतची लेखी तक्रार तक्रारदाराने प्रथमत: संबंधित अधिविभाग प्रमुख/प्रशासकिय विभागप्रमुखांच्याकडे पाठवावी. विभाग प्रमुखानी सदर तक्रारीचे निराकरण त्यांच्या पातळीवर करुन त्याबाबतचा लेखी अहवाल मूळ तक्रारीसह मा.अध्यक्ष, जातीआधारित भेदभाव प्रतिबंध समिती, विशेष कक्ष, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचेकडे पाठवावा. तसेच अधिविभागप्रमुख/प्रशासकिय विभागप्रमुख यांच्या स्तरावर त्यांच्याकडे प्राप्त झालेल्या तक्रारीचे निराकरण झाले नाही तर सदरची तक्रार तक्रारदाराने त्यांच्या अधिविभाग प्रमुख/प्रशासकिय विभागप्रमुखांनी केलेल्या कार्यवाही अहवालासह मा.अध्यक्ष, जातीआधारित भेदभाव प्रतिबंध समिती, विशेष कक्ष, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचेकडे पाठवावी.

जा.क्र.शिवाजी विद्यापीठ/विशेष कक्ष/ 2022/23/924
दिनांक – 28 SEP 2022

(डॉ.व्ही.एन.शिंदे)
प्र.कुलसचिव
शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर